**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी ४११ ०१८**
**ब प्रभाग समिती, चिंचवड ४११ ०३३**
**कार्यपत्रिका क्र. ४**
**सभावृत्तांत**
**(दिनांक ६/०८/२०१९ ची तहकुब सभा)**

दिनांक :- ९/९/२०१९ वेळ :- दुपारी १२.१५ वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या ब प्रभाग समितीची दिनांक ६/०८/२०१९ ची तहकुब मासिक सभा आज सोमवार दिनांक ९/०९/२०१९ रोजी दुपारी १२.१५ वा. ब प्रभाग कार्यालयाचे छत्रपती शिवाजी महाराज सभागृहामध्ये आयोजित करणेत आली होती. प्रस्तुत सभेस खालीलप्रमाणे सन्मा. नगरसदस्य उपस्थित होते.

१. मा.करुणा शेखर चिंचवडे - अध्यक्ष
२. मा.प्रज्ञा महेश खानोलकर
३. मा.नामदेव जनार्दन ढाके
४. मा.माधुरी कुलकर्णी उर्फ मोनाताई
५. मा.सचिन बाजीराव चिंचवडे
६. मा.सुरेश शिवाजी भोईर
७. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील
८. मा.राजेंद्र तानाजी गावडे
९. मा.निता विलास पाडाळे
१०. मा.उषा दिलीप काळे
११. मा.संतोष अंकुश कोकणे
१२. मा.विठ्ठल भोईर - नामनिर्देशीत सदस्य

याशिवाय खालील प्रमाणे अधिकारी / कर्मचारी उपस्थित होते.

श्री.संदिप खोत – क्षेत्रीय अधिकारी, श्रीमती प्रभा गाडेकर – प्रशासन अधिकारी, श्री.प्रशांत पाटील - कार्यकारी अभियंता, स्थापत्य विभाग, श्री.इ.बी.पाटील - कार्यकारी अभियंता,विद्युत,श्री.कुंडलिक दरवडे – सहा.आरोग्य अधिकारी, मा.आर.एम.इंगळे – उपअभियंता स्थापत्य विभाग, मा.सी.एन.धानोरकर, उपअभियंता स्थापत्य विभाग, श्री.देवकते – कनिष्ठ अभियंता,विद्युत, श्री.मोने – कनिष्ठ अभियंता, स्थापत्य, श्री.नरोटे – उपअभियंता, स्थापत्य, उद्यान, श्रीमती अमृता लागु – लेखाधिकारी इत्यादी.

सर्वप्रथम मा. सभाध्यक्ष करुणाताई शेखर चिंचवडे यांनी उपस्थितांचे स्वागत करुन सभेचे कामकाजास सुरुवात केली.

## दिनांक २/०७/२०१९ रोजीचा सभावृत्तांत क्र.३ कायम करणेत आला.

ठराव क्र. ३ विषय क्र. १

दि. ९ /९/२०१९

सुचक : मा.राजेंद्र गावडे अनुमोदक: मा.अश्विनी चिंचवडे

संदर्भ :- मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.स्था/बीआरटीएस/६५७/२०१९
दि.२०/०७/२०१९ चे पत्र

मा.कार्यकारी अभियंता यांचे जा.क्र.स्था/बीआरटीएस/६५७/२०१९ दि.२०/०७/२०१९ चे पत्रानुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील सांगवी ते किवळे बीआरटी मार्गाला श्री छत्रपती शिवाजी महाराज यांचे नाव देण्यास मान्यता देणेबाबत विचार करणे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्र. ४ विषय क्र. २

दि. ९ /९/२०१९

सुचक : मा.नामदेव ढाके अनुमोदक: मा. संतोष कोकणे

संदर्भ :- मा. संतोष कोकणे यांचे दि.२२/०७/२०१९ चे पत्र

मा.संतोष कोकणे यांचे दि.२२/०७/२०१९ चे पत्रानुसार, वॉर्ड क्र.२२ काळेवाडी नढेनगर या ठिकाणी वैभव पॅराडाईज सोसायटी शेजारील ०९.०० मी रस्ता चौकाला लोकांच्या मागणीनुसार डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक असे नाव देण्यास मान्यता देणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठरावाप्रमाणे कार्यवाही करणेत यावी.

सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

वरील प्रमाणे सभेचे कामकाज झाले मा. करुणाताई शेखर चिचवडे यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानून सभा संपल्याचे जाहिर केले.

[करुणाताई शेखर चिंचवडे ]
अध्यक्ष
ब प्रभाग समिती, चिंचवड

पिंपरी चिंचव महानगरपालिका,
ब प्रभाग कार्यालय, चिंचवड ३३
जा. क्र. बक्षे/सभाशाखा/२/कावि/१२/२०१९.
दिनांक : ३०/ ०९ /२०१९

प्रशासन अधिकारी तथा
सचिव( सभाशाखा )
ब प्रभाग समिती

प्रत -सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी
यांचेकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना